निशाणी क्र.१५/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - राजेश कमलाकर नाईक,
वय - ५५ वर्षे,
व्यवसाय - खाजगी नोकरी,
राहणार - वृंदावन सोसायटी, ठाणे वेस्ट, जि. ठाणे.

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी वृंदावन सोसायटी येथे माझी पत्नी व मुलगी यांच्यासह राहण्यास आहे. मी सन २०२२ पासून पोतदार ग्लोबल प्रा.लि. या कंपनीमध्ये वेअर हाउसचा ब्रँच मॅनेजर म्हणून नोकरी करतो. आमच्या कंपनीच्या कोचीन, कलकत्ता, चेन्नई येथे ब्रँच आहेत तसेच खालापूर येथील सांगडेवाडी येथे देखील आमची शाखा आहे. मी मुंबई येथील ऑफिस मध्ये असतो. मी दर दहा ते बारा दिवसांनी सांगडेवाडी येथील शाखेला भेट देत असतो. तसेच दिल्ली येथील आमच्या हेड ऑफिस मधुन देखील कंपनीचे अधिकारी सांगडेवाडी येथे शाखेला भेट देण्यासाठी येत असतात. मी फिर्यादी अमितकुमार अनिलकुमार दुबे यांना ओळखतो. ते आमच्या दिल्ली येथील ऑफिस मध्ये सेल्स मॅनेजर म्हणून नोकरी करतात. त्यावेळी त्यांना कंपनीच्या कामासाठी सांगडेवाडी येथे वेअरहाउस मध्ये पाठवण्यात आले होते. दि. २२/०४/२०२३ रोजी रात्री ०८:०० वा. च्या सुमारास ला अमितकुमार दुबे यांचा फोन आला व त्यांनी मला फोनवर सांगितले की, रोहीदास पाटील हे आले होते व त्यांनी मला धक्काबुक्की केली. गवत कापण्याच्या कामासंबंधी रोहीदास पाटील व त्यांच्यासोबत इतर दोघेजण आले होते व त्यांनी त्यांना धक्काबुक्की केली असे त्यांनी मला फोनवर सांगितले. अमित दुबे यांनी दुस-यांकडून गवत कापण्याचे काम करुन घेतले होते हे रोहीदास पाटील यांना पटले नव्हते. त्यानंतर त्यांनी आमच्या कंपनीचे वरीष्ठ सुनिल पोतदार व मिथीलेश कुमार शर्मा यांना देखील सांगितले. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार

दिली. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. त्यांनी माझ्याकडे फोनवरच चौकशी केली होती. आरोपी क्र. १ याला पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र. १ आज न्यायालयात हजर आहे. इतर आरोपींना मी ओळखू शकत नाही. त्यानंतर मला पोलिसांकडून इतर आरोपींची नावे समजली होती ती नावे मला सांगता येणार नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपीचे वकील श्री. एस. टी. वाडेकर यांनी उलटतपास नाकारला...**

२) हे म्हणणे खरे आहे की, पोतदार ग्लोबल प्रा. लि. ही बरीच मोठी कंपनी आहे. हे म्हणणे खरे आहे की, खाजगी कंपनी असल्यामुळे कंपनी मधील अंतर्गत कामे करुन घेण्यासंबंधी टेंडर काढावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, टेंडर काढल्यानंतर ठेकेदार यांचे रेट पाहुन ठेकेदारांना संबंधीत कामाचे कॉन्ट्रॅक्ट दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, टेंडर कोणाला द्यायचे हे ठरवण्याचा पुर्ण अधिकार कंपनीचे मुख्याधिकारी यांना असतो. हे म्हणणे खरे आहे की, गवत कापण्याचे टेंडर पास करण्याचा अधिकार अमितकुमार दुबे यांना कंपनीने दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अधिकारांचा गैरवापर करणे हा कंपनी कायद्यानुसार गुन्हा आहे. गवत कापण्याचे कॉन्ट्रॅक्ट कोणाला देण्यात आले होते व त्यांचे रेट काय होते हे दाखवणारे कागदपत्र मी वैयक्तिक पोलिसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ चा आमच्या सांगडेवाडी येथील वेअरहाउस मध्ये ट्रान्सपोर्टचा ठेका होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपी क्र. १ चे कंपनी मध्ये येणे-जाणे असायचे. हे म्हणणे खरे आहे की, कंपनी मध्ये आरोपी क्र. १ च्या गाड्या येत असल्यामुळे आरोपी क्र. १ चे कंपनी मध्ये येणे बेकायदेशीर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कंपनीने गवत कापण्याचे कॉन्ट्रॅक्ट आरोपी क्र. १ ला दिले नव्हते किंवा आरोपी क्र.१ ने सदर कॉन्ट्रॅक्ट मिळण्यासाठी अप्लाय केले होते हे दाखवणारे कागदपत्र मी स्वतः पोलिसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, अमितकुमार दुबे यांनी गवत कापण्याच्या टेंडर संबंधीचे कोणतेही कागदपत्र आमच्या ब्रँच कडे मागणी केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेची ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही.

**प्रश्नः** ही घटना तुम्ही प्रत्यक्ष पाहीली नसल्यामुळे ती खरी आहे का किंवा जशीच्या तशी घडलेली आहे का हे तुम्ही सांगु शकत नाही ?

**उत्तरः** मला अमितकुमार दुबे यांनी सीसीटीव्ही रेकॉर्डींग दाखवले होते. त्यात त्याने मला घटना दाखवली होती.

३) मी माझा जबाब नोंदवतेवेळी पोलिसांना अमितकुमार दुबे यांनी मला सीसीटीव्ही रेकॉर्डींग पाठवल्याचे व त्यामध्ये मी घटना कशी झाली हे पाहील्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या जबाबात अमितकुमार दुबे यांनी सांगितलेली घटना खरी आहे व ती सीसीटीव्ही मध्ये चित्रीत झालेली आहे असे सांगितलेले नाही. आमच्या कंपनी मध्ये त्यावेळी ऑडीओ रेकॉर्डींग करणारे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी आरोपी क्र. १ ते ३ यांची कोणतीही ऑडीओ रेकॉर्डींग ऐकलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ची गाडी आमच्या कंपनी मध्ये येत असल्याने मी त्याला व्यक्तीशः नावानिशी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ व ३ यांना मी पाहीलेले नाही व मी त्यांना ओळखत देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, अमितकुमार दुबे यांनी पाठवलेले व्हीडीओ रेकॉर्डींग व आरोपी क्र. १ ते ३ हे एकत्रित पाहुन तशी ओळख परेड पोलिसांनी माझ्यासमक्ष घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अमितकुमार दुबे यांनी तक्रार दिल्यानंतर आम्ही आरोपी क्र. १ याची कंपनी मधील गाडी बंद केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ चे सर्विस रेट इतर गाडी मालकांच्या रेट पेक्षा जास्त होते. हे म्हणणे खरे आहे की, रेट जास्त असल्यामुळे ते कंपनीला परवडणारे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, रेट परवडणारे नसल्यामुळे आरोपी क्र. १ ची गाडी कंपनीला बंद करायची होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ चा कंपनी मधील ठेका बंद करायचा असल्यामुळे कंपनीने खोटे षडयंत्र रचुन अमितकुमार दुबे यांच्याशी संगणमत करुन आरोपी क्र. १ विरुध्द खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी

खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.02.12 17:07:32 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - १२/०२/२०२६